# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:30.06.2025** **वार:सोमवार**

1. लोकसहभागाच्या बळावर मोठमोठ्या संकटांचा सामना करता येऊ शकतो हे आणीबाणीच्या काळानं दाखवून दिल्याचं पंतप्रधानांचं मनकीबातमध्ये प्रतिपादन
2. स्वच्छतेबाबत राज्यातल्या पाटोदा ग्रामपंचायतीच्या आणि पर्यावरण रक्षणाबाबत पुण्यातील खरमाळे कुटुंबियांच्या प्रयत्नांचा पंतप्रधानांकडून मनकीबातमध्ये गौरव
3. राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन आजपासून मुंबईत सुरू होणार; सरकारच्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार
4. त्रिभाषा सूत्रासंदर्भातील दोन्ही शासन निर्णय रद्द; डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात समिती स्थापन करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मन की बात**

लोकसहभागाच्या ताकदीच्या बळावर मोठमोठ्या संकटांचा सामना करता येऊ शकतो, हे आणीबाणीच्या काळानं दाखवून दिल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमाच्या एकशे तेविसाव्या भागात ते काल बोलत होते. आणीबाणीच्या घटनेला पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त, देशात संविधान हत्या दिवस पाळला गेला; त्याबाबत त्यांनी माहिती दिली. मोरारजी देसाई आणि अटलबिहारी वाजपेयी या माजी पंतप्रधानांनी आणीबाणीच्या निषेधात केलेल्या भाषणांचा अंशही त्यांनी ऐकवला.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देशासह जगभरात झालेल्या विविध उपक्रमांचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. देशाच्या विविध भागात सध्या सुरू असलेल्या यात्रा, आणि या यात्रांमध्ये सहभागी होणारे भाविक म्हणजे एक भारत श्रेष्ठ भारत भावनेचं प्रतिबिंब असल्याचं पंतप्रधान म्हणाले. महाराष्ट्रातल्या छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातल्या पाटोदा ग्रामपंचायतीनं सामूहिक प्रयत्नातून स्वच्छतेबाबत केलेल्या उपाययोजनांची माहिती पंतप्रधानांनी दिली.......

**छत्रपति संभाजी नगर ज़िले की ग्राम पंचायत है 'पाटोदा'। ये Carbon Neutral गाँव पंचायत है। इस गाँव में कोई अपने घर के बाहर कचरा नहीं फेंकता। हर घर से कचरा इकट्ठा करने की पूरी व्यवस्था है। यहाँ गंदे पानी का Treatment भी होता है। बिना साफ किए कोई पानी नदी में नहीं जाता। यहाँ उपलों से अंतिम संस्कार होता है और उस राख से दिवंगत के नाम पर पौधा लगाया जाता है। इस गाँव में साफ-सफाई भी देखते ही बनती है। छोटी-छोटी आदतें जब सामूहिक संकल्प बन जाती हैं, तो बड़ा बदलाव तय हो जाता है।**

जागतिक आरोग्य संघटनेनं भारत हा ट्रॅकोमा या डोळ्यांच्या आजारापासून मुक्त झाल्याची घोषणा केली असल्याची माहिती मोदी यांनी दिली. आपलं सामर्थ्य वाढवण्यासाठी आरोग्याकडे लक्ष देण्याचं आवाहन त्यांनी

केलं. भगवान बुद्धांचे पवित्र अवशेष विविध देशातल्या जनतेच्या दर्शनासाठी पाठवण्यात आले आहेत, असं सांगून सर्वांनी आपापल्या राज्यातल्या बौद्ध स्थळांना भेट द्यावी असं आवाहन त्यांनी केलं. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचलेले पहिले भारतीय ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्याशी झालेल्या संवादाविषयी देखील पंतप्रधानांनी श्रोत्यांना सांगितलं.

नुकत्याच झालेल्या जागतिक पर्यावरण दिनाच्या अनुषंगानं बोलताना त्यांनी देशभरात होत असलेल्या विविध प्रेरणादायी उपक्रमांची माहिती दिली. यावेळी पुण्याचे रमेश खरमाळे यांच्या प्रयत्नांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. खरमाळे आणि त्यांचे कुटुंबीय जुन्नरच्या डोंगराळ भागात जाऊन रोपं लावतात, पाण्यासाठी चर खणतात, छोटे तलाव तयार करतात. याबाबत बोलताना रमेश खरमाळे म्हणाले.....

**आज आमच्या कार्याची दखल देशाचे पंतप्रधान मोदी साहेबांनी घेतली, त्याबद्दल खरंच आनंद होतो आहे. गेली बारा वर्ष आमचं जे कुटुंब आहे, हे काम करत आहे पर्यावरण संवर्धनाचं. तर असे छोटाछोटाले काम करणारी जी आमच्यासारखी जी तळागाळातली माणसं आहेत, त्यांची जर कौतुकाची थाप जर त्यांच्या पडत असेल, तर निश्चितच पर्यावरणासाठी ही लोकं मोठ्या प्रमाणामध्ये कामं करतील. तर आमचा हाच ध्यास आहे की चांगला श्वास घ्यायचा असेल तर झाडे वाढणं फार गरजेचं आहे. त्यामुळं कुठेतरी जागतिक तापमान वाढीला आळा बसेल निश्चितच आपली जी रोगराई आहे ही कुठेतरी हटण्यास मदत होईल.**

**अधिवेशन**

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन आजपासून मुंबईत सुरू होत आहे. अधिवेशनच्या पूर्वसंध्येला काल सरकारनं चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता; या चहापानाच्या कार्यक्रमावर महाविकास आघाडीतील विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकला. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकार आणि विरोधक दोघांनीही स्वतंत्रपणे पत्रकार परिषद घेत आपापली भूमिका स्पष्ट केली. राज्यात त्रिभाषा सूत्र राबवण्यासंदर्भातले दोन्ही शासन निर्णय रद्द करत असल्याची घोषणा काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसंच यासंदर्भात पुन्हा अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात समिती स्थापन करण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले.....

**त्रिभाषा सूत्राच्या संदर्भात ही भाषा कुठल्या वर्गापासून लागू करावी, ती कशाप्रकारे करावी कुठली करावी काय मुलांना चॉईस द्यावा, याचा निर्णय करण्याकरता राज्य सरकारच्यावतीनं डॉक्टर नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वात एक कमिटी तयार करण्यात येईल. त्या काही सदस्य अजून असतील आणि या समितीचा रिपोर्ट आल्यानंतरच त्रिभाषा सूत्र त्या रिपोर्टच्या आधारावर या ठिकाणी लागू केलं जाईल. आणि म्हणून 16 एप्रिल 2025 आणि 17 जून 2025 हे दोन्ही शासन निर्णय आम्ही रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे.**

तत्पूर्वी विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेसचे विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जितेंद्र आव्हाड यांच्यासह विरोधी पक्षाच्या इतर नेत्यांनी पत्रकार परिषद घेत सरकारवर टीका केली. भ्रष्टाचार, मराठीवर अन्याय, हिंदीची सक्ती, शक्तिपीठ महामार्गाला विरोध आदि मुद्द्यांवर राज्य सरकार पूर्णपणे अपयशी ठरलं आहे; राज्यात कायदा-सुव्यवस्था राखण्यात सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याची टीका अंबादास दानवे यांनी केली. तर विजय वडेट्टीवार यांनी शेतकऱ्यांची कर्जमाफी, बेरोजगारी या मुद्द्यांवरून सरकारवर टीका केली.

दरम्यान, राज्य सरकारने त्रिभाषा सूत्राबाबतचा शासन निर्णय रद्द करणं हा मराठी माणसाच्या एकजुटीचा विजय असल्याचं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. मनसे नेते राज ठाकरे यांनीही हा शासन निर्णय रद्द केल्याबद्दल आनंद व्यक्त केला असून हा निर्णय पुढेही कायम राहील अशी आशा व्यक्त केली.

**विधी विद्यापीठ**

नागपूरमधील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठानं उत्तम शैक्षणिक कामगिरी बजावत आपल्या गुणवत्तेच्या माध्यमातून जागतिक स्तरावर ओळख निर्माण करावी, असं प्रतिपादन देशाचे सरन्यायाधीश आणि विद्यापीठाचे कुलपती न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केलं. नागपूरमध्ये वारंगा इथं महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचं उद्घाटन आणि ग्रंथालयाच्या इमारतीचं भूमिपूजन काल सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते.

**मोहोळ**

अहमदाबाद विमान अपघाताची, विमान अपघात अन्वेषण संस्था सर्वंकष चौकशी करेल, असं नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितलं. एका खासगी वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात ते काल पुण्यात बोलत होते. या अपघातामागे घातपाताची शक्यता सध्यातरी आढळून आलेली नाही, असं ते म्हणाले.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपल, नमस्कार